# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



नाताळ सणाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!




## ७० प्रवाशांना घेऊन जाणारे विमान कोसळले कझाकिस्तानच्या एअरपोर्टवरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ कझाकिस्तान**

कझाकिस्तानमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. रशियाला जाणारे विमान अकताऊ एअरपोर्टवर कोसळलं. लँडिंगदरम्यान ही घटना घडली. या विमानातून ७० पेक्षा अधिक प्रवासी होते. या घटनेचा थरारक व्हिडीओ समोर आला असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. घटनास्थळी सध्या बचावकार्य युद्धपातळीवर केले जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कझाकिस्तानच्या अकताऊ शहरातील एअरपोर्टवर लँडिंगदरम्यान विमान कोसळले आणि विमानाला मोठी आग लागली. या दुर्घटनेमध्ये किती प्रवासी जखमी झाले आहेत याबाबत अद्याप काहीच माहिती समोर आली नाही. पण या घटनेमुळे अकताऊ एअरपोर्टवर खळबळ उडाली आहे. घटनास्थळी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

कझाकिस्तानच्या मीडियाने आरोग्य मंत्र्यांच्या हवाल्याने सांगितले की, एका लहान मुलासह १२ प्रवाशांचा जीव वाचवण्यात यश आले आहे. या सर्व जखमींना तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तज्ज्ञ, ट्रॉमाटोलॉजिस्ट, न्यूरोसर्जनसह सर्व बचाव पथके घटनास्थळी पाठवली आहेत. एअर म्ब्युलन्सचीही व्यवस्था करण्यात आली आहे. घटनास्थळी मदतकार्य आणि बचावकार्य सुरू आहे.

रशियाला जाणाऱ्या एम्ब्रेअर १९० एएचवाय ८२४३ या विमानाला पक्षी धडकल्याचा दावा केला जात आहे. त्यानंतर विमानात तांत्रिक बिघाड झाला. यामुळे विमानाच्या पायलटने आपत्कालीन लँडिंगसाठी अकताऊ एअरपोर्टशी संपर्क साधला. पण विमान उतरण्याआधीच स्टेअरिंग बिघडल्याने ते कोसळले आणि विमानाला आग लागली. विमानाला लागलेली आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## बीडमध्ये कुणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही - देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

बीड आणि परभणीच्या घटना गंभीर होत्या. आम्ही सुद्धा त्या घटना गंभीरतेने घेतल्या. बीड जिल्ह्यामध्ये कोणाचीही दादाहिरी चालणार नाही, असे इशाराच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. नागपूरमध्ये ते पत्रकारांशी बोलत होते. बीडमध्ये सरपंच पती संतोष देशमुख याची हत्या करण्यात आली, त्यावरून राजकीय वातावरण तापले होते. विरोधकांकडून कायदा अन् सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कठोर कारवाईचे स्पष्ट संकेत दिलेत.

मी राजकारणी नाही, मी माझा मार्गाने राजकारण करतो. केंद्रबिंदू साकारात्मक आहे, पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो आणि आज झालं होतं तरी अनुभवातून आपण शहाणं होत असतो. आपल्या चुका कमी होतात होत नाही, असं नाही. जो काम करेन, निर्णय घेईल तो चूक करेल. निर्णय घेतले पाहिजेत आणि कधी चूक झाली तर त्या सुधारणा त्याच्यामध्ये केली पाहिजे. वेळ पडल्यास तो निर्णय मागे घेतला पाहिजे, मी अनेकदा अनेक निर्णय मागे घेतले, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



छगन भुजबळ यांच्यासंदर्भात आम्ही तिघेही मिळवून एकत्रितपणे निर्णय घेऊयात. भुजबळ हे प्रमुख नेते आहेत. मी असो, अजितदादा असो की शिंदे साहेबांच कोणाचयाही मनात दुमत नाही. त्यांचा काय योग्य मार्ग काढायचा तो योग्य मार्ग आम्ही काढू, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फेक नारेटिव्ह ब्रेक करून जनतेपर्यंत पोहचल्यानं पहिल्यांदा २३७ जागेच्या माध्यमातून मोठं यश मिळालं. भाजपला सुद्धा १३२ जागा मिळवता आल्या. एवढं चांगलं यश मिळाल्यानं जवाबदारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बहुमत, अपेक्षा, आव्हान घेऊन येतात. येणाऱ्या अडचणींवर मात करणं, जनतेच्या मनात महाराष्ट्र उभा करायचा होता. मागील वेळी अनेकांना शंका होत्या, मुख्यमंत्री कसे असतील? खरंच काम होईल का? पश्चिम महाराष्ट्राच्या लोकांना शंका होती विदर्भावर बोलणारा महाराष्ट्रभर काम करेल का? पण मुख्यमंत्री असताना कुठल्याच भागात अन्याय होऊ दिला नाही, सिंचन प्रकल्प पूर्ण केले, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातीळ ५ प्रकल्प पूर्ण केले. मोठी भरारी मारली, जी संधी मिळाली, त्यातून अनेक खात्याचे काम केले, असे फडणवीस म्हणाले.

## १२ लाख महिलांचा लाडकी बहीण योजनेत नव्याने समावेश, आदिती तटकरेंची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

राज्यातील लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी आहे. ज्या महिलांना आधारकार्ड सिडिंग प्रक्रियेमुळे लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागले होते त्या लाडक्या बहिणींना देखील आता पैसे मिळणार आहेत. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली. तब्बल १२ लाख महिलांचा लाडकी बहीण योजनेमध्ये नव्याने समावेश करण्यात आला आहे. या सर्व महिलांना आजपासून लाडकी बहीण योजनेच्या हफ्त्याचे पैसे मिळणार आहे, असे आदिती तटकरे यांनी सांगितले.

आदिती तटकरे यांनी अधिकृत एक्स अकाऊंटवर लाडकी बहीण




योजनेबाबत केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, 'महिला सशक्तीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्वाचे पाऊल टाकत आज मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे चालू आहे. विधानसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेमुळे थांबलेली प्रक्रिया आज पुन्हा सुरू करून दुसऱ्या टप्प्यात सुमारे ६७,९२,२९२ भगिनींना डिसेंबर महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.'

आदिती तटकरेंनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये असे सांगितले की, 'डिसेंबर महिन्याच्या हफ्त्याच्या निधी वितरणाची सुरूवात आपण आजपासून करत आहोत. साधारणपणे ९ ऑक्टोबर रोजी आपण शेवटचे डिबीटी केले होते. त्यावेळी जवळपास २ कोटी ३४ लाखांपेक्षा अधिक महिलांना आपण या योजनेचा लाभ दिला होता. डिसेंबर महिन्याचा आज हफ्ता वितरित करत असताना यामध्ये २ कोटी ३४ लाख महिलांचा समावेश आहेच. पण ज्या महिलांना आधार सिडींगमुळे लाभापासून वंचित राहावे लागले होते. त्यामधील ज्यांचे आधार सिडिंग झाले आहे त्या लाभार्थ्यांना सुद्धा निधी वितरणाची सुरूवात करत आहोत.


'साधारण २ कोटी ३४ लक्ष आणि आता आधार सिंडिंग झालेल्या लाभार्थींना येत्या ४ ते ५ दिवसांत टप्प्या टप्प्याने लाभाचे वितरण करणार आहोत. नव्याने आधार सिंडिंग झालेल्यांपैकी १२ लाखांपेक्षा जास्त महिलांना लाभ वितरणाची सुरूवात केली आहे. ६७ लाखांपेक्षा अधिक महिलांना आज आपण पहिल्या दिवशी लाभ वितरीत करत आहोत. उद्या, परवा आणि आणखी पुढचे २ दिवस असे चार दिवस रोज महिलांना लाभ वितरीत केला जाईल. त्यामुळे अधिकाधिक महिलांना तीन ते चार दिवसांच्या कालावधीत लाभाचे पैसे पोहचणार आहेत.'

## महाराष्ट्राला पर्यटनामध्ये प्रथम क्रमांकाचे राज्य बनवू, पर्यटनमंत्री शंभूराज देसाईंची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ कराड**

राज्याचा पर्यटन विकास आराखडा नव्याने तयार करणार असून, पर्यटनात महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य बनवणार असल्याची ग्वाही राज्याचे नवनिर्वाचित पर्यटन, खाणीकर्म व माजी सैनिक कल्याणमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेटमंत्री म्हणून नव्याने समावेश झाल्यानंतर शंभूराज देसाई हे प्रथमच आपल्या पाटण विधानसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर आले असता कराडमध्ये पत्रकारांशी बोलत होते.



शंभूराज म्हणाले, महाराष्ट्रात पर्यटनाला खूप मोठा वाव असल्याने जागतिक पर्यटन तज्ज्ञांची मदत घेऊन संपूर्ण राज्याचा नव्याने पर्यटन विकास आराखडा तयार करणार आहे. त्या आराखड्यानुसार महाराष्ट्राला पर्यटनात देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनवण्याचा आपला मानस आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट म्हणून नव्याने शपथ घेतल्यानंतर कर्मभूमीत येत असताना, सर्वत्र उत्स्फूर्त झालेले स्वागत हे महायुतीवरील प्रेम मतदारांमधून व्यक्त होत असल्याचे मनस्वी समाधान आहे. एकनाथ शिंदे यांनी मला पुन्हा मंत्रिपदाची संधी दिली. माझ्याकडे पर्यटन, खाणीकर्म, माजी सैनिक कल्याण या खात्यांचा पदभार असून, या सगळ्या विभागांना न्याय देण्याचा माझा प्रयत्न असल्याची ग्वाही मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

### प्रतापगडचा विकास साधणार

प्रतापगड हा ऐतिहासिक किल्ला असून, गड संवर्धनाच्या उद्देशाने प्रतापगडचा आराखडा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच तयार करताना त्याला निधीही मिळाला आहे. आता प्रतापगड विकासाचा दुसरा टप्पा मार्गी लावण्यासाठी लगेचच पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रतापगडची पाहणी करणार असल्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

## बीड आहे की 'वासेपूर'? गेल्या १० महिन्यात जिल्ह्यात ३६ खून, १५६ अत्याचाराच्या घटना; ३८६ विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५ बीड**

बीड जिल्हा आहे की गँग ऑफ वासेपूर सिनेमातील वासेपूर असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. कारण जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या गेल्या १० महिन्यांच्या कालावधीत बीड जिल्ह्यात ३६ खून झाल्याची नोंद पोलीस ठाण्यात झाली आहे. यामध्ये मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मर्डरचाही समावेश आहे. सरपंच देशमुख यांच्याशिवाय मरळवाडीचे सरपंच बापू आंधळे यांचा देखील खून करण्यात आला होता.

जिल्ह्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३६ खून झाल्याची नोंद आहे. यात परळीतील सरपंचाच्या खुनाचाही समावेश आहे. यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्याचाही समावेश होता. याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला तरी हा नेता अद्यापही एलसीबी आणि स्थानिक पोलिसांना सापडलेला नाही. तसेच खून करण्याचा प्रयत्न केल्याच्याही १६८ घटनाही घडलेल्या आहेत.




गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे १० महिन्यांत दाखल आहेत. यातील ७ गुन्हे अजूनही उघड झालेले नाहीत..याशिवाय १५६ अत्याचाराच्या ३८६ विनयभंग झाल्याच्या घटना देखील या कालावधीत समोर आल्या आहेत. बीड जिल्ह्यात महिला, मुली देखील सुरक्षित नाहीत. १० महिन्यांत अत्याचाराच्या १५६ तर विनयभंग, छेडछाडीच्या ३८६ घटना घडल्या आहेत...

### दोन सरपंचांच्या हत्या झाल्याने बीड जिल्ह्यात खळबळ

बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांमध्ये दोन सरपंचाच्या हत्या झाल्या आहेत. मरळवाडीचे सरपंच बापू आंधळे यांची हत्या झाल्याने एकच खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले होते. दरम्यान, बापू आंधळे यांच्या हत्येनंतर आता सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे बीड जिल्हा हादरलाय. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी विरोधी पक्षाकडून संसदेत आणि राज्याच्या विधीमंडळात देखील आवाज उठवण्यात आलाय. देशमुख यांच्या हत्येला जबाबदारी असणाऱ्यांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणत्याही आरोपीला सोडणार नाही, असा शब्द दिला होता. मात्र, अजूनही या प्रकरणातील बरेचशे आरोपी फरार आहेत.

## सुप्रीम कोर्टाने मोकळे सुटलेल्या ईडीचे हात बांधले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने गेली अनेक दिवसांपासून मोकळ्या मैदानात वावरणाऱ्या ईडी ( एऊ) विभागाचे जरा हात बांधले आहेत. न्यायालयाच्या निकालानुसार आता ईडी (एऊ) अधिकाऱ्यांना मोबाईल आणि लॅपटॉप तपासण्याची अनुमती नाही. त्याचबरोबर मोबाईल, लॅपटॉपचा क्सेस देता येणार नाही शिवाय डेटा कॉपी करता येणार नाही.



या निर्णयासोबतच छापा टाकल्यानंतर संशयिताच्या खाजगी वस्तूंना हात लावता येणार नाही. विशेष करून इलेक्ट्रॉनिक वस्तू ताब्यात घेता येणार नसल्याचं कोर्टाने सांगितले आहे. नोव्हेंबरमध्ये लॉटरी किंग सँटियागो मार्टिन, त्याचे नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांवर ईडीने धाडी टाकल्या होत्या. या प्रकरणात कोर्टाने हा आदेश दिला आहे.

## शिर्डी महोत्सवाची संस्थानच्या वतीने जय्यत तयारी; ३१ डिसेंबरला रात्रभर साई मंदिर राहणार दर्शनासाठी खुलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५शिर्डी**


२०२४ या सरत्या वर्षाला निरोप आणि २०२५ या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत लाखो भाविक येणार असल्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३१ डिसेंबर रोजी रात्री साई मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुलं ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिलीय. चालू वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीने शिर्डीत चार दिवसीय शिर्डी महोत्सव साजरा करण्यात येणार असून, या महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आलीय. २९ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ अखेर ४ दिवस विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनदेखील साई संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिलीय.

### ९० पायी पालख्या येणार :

नवीन वर्षानिमित्ताने साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. तसेच शिर्डी महोत्सवाकरिता राज्यासह देशातील अनेक भागातून ९० पायी पालख्या येणार असल्याची नोंदणी भाविकांनी केलेली आहे. येणाऱ्या साईभक्तांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात तसेच अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी साई धर्मशाळा आणि भक्त निवासस्थान या ठिकाणी ३४ हजार ५०० चौरस फुटाचे मंडप उभारण्यात आलेले आहे.

### मोतीचूर लाडू प्रसाद पाकिटे तयार

या महोत्सवाकाळात



साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकरिता सुमारे १२० क्विंटल साखरेचे मोफत बुंदी प्रसाद पाकिटे आणि सुमारे ४०० क्विंटल साखरेचे मोतीचूर लाडू प्रसाद पाकिटे तयार करण्यात आली आहेत. तसेच उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहजतेने उपलब्ध व्हावे, यासाठी नवीन दर्शन रांग, श्रीसाईनाथ मंगल कार्यालय, द्वारकामाई समोरील खुले नाट्यगृह, मारुती मंदिराशेजारी साईकॉम्प्लेक्स, गेट नंबर ४ चे आतील बाजू, श्रीसाईप्रसादालय, सेवाधाम इमारत व सर्व निवासस्थाने आदी ठिकाणी लाडू विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत.

### एक हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत

या कालावधीत भक्तांच्या सोयीसाठी नवीन दर्शनरांग, मंदिर परिसर, साईआश्रम आणि श्री साईप्रसादालय आदी ठिकाणी प्रथमोपचार केंद्राची व्यवस्था करण्यात येणार असून, तातडीचे सेवेसाठी मंदिर परिसरात, नवीन भक्तनिवासस्थान, धर्मशाळा आणि श्रीसाईप्रसादालय येथे रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहेत. तसेच सुरक्षाकर्मी, पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी, एक शिघ्र कृतीदल पथक, एक बॉम्ब शोधक पथक तैनात असून, बंदोबस्तासाठी अतिरिक्त पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पुरुष पोलीस कर्मचारी आणि महिला पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येऊन, याव्यतिरिक्त संस्थानचे पोलीस निरीक्षक आणि सुरक्षा कर्मचारी असे एकूण एक हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत राहणार आहेत.

### साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांनी चांगलीच गर्दी

मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ या दिवशी साई समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येणार असल्यामुळे रात्री १० वाजता साईंची होणारी शेजारती आणि १ जानेवारी रोजी पहाटेची ५.१५ वाजता होणारी काकड आरती होणार नाही, असेही साईबाबा संस्थानच्या वतीने सांगण्यात आलंय. नाताळच्या सुट्ट्यामुळे शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांनी चांगलीच गर्दी केली असून, आज लाखांहून अधिक भाविक शिर्डीत दाखल झालेत.

## संपादकीय ......

# नव्या सरकारवर भाजपाचे नियंत्रण

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला २८८ पैकी २३२ जागांवर महाप्रचंड विजय मिळाला. ५ डिसेंबरला मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाला आणि १५ डिसेंबरला मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन २१ डिसेंबरच्या रात्री खातेवाटप जाहीर झाले. सरकार स्थापनेला व मंत्र्यांच्या खातेवाटपाला खूपच विलंब झाला, पण सर्वाधिक १३२ आमदार भाजपाचे निवडून आल्याने नव्या सरकारची रचना भाजपाला पाहिजे तशीच होणार हे अपेक्षितच होते. सरकारला पाठिंबा दिलेल्या अपक्ष आमदारांसह महायुतीकडे विधानसभेत आमदारांची संख्या २३७ आहे. हा महाविक्रमी आकडा आहे व दुसरीकडे विरोधी पक्षांच्या बाकावर पन्नासही आमदार नाहीत. म्हणूनच भाजपा जसे सांगेल तसेच नव्या सरकारमध्ये घडेल. महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार हे ताकदवान नेते असले तरी त्यांनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतील तसेच सरकार चालवावे लागणार आहे. गृहखात्याचे महत्त्व मुख्यमंत्र्यांना व भाजपाला चांगले ठाऊक आहे. युतीच्या सरकारमधेही भाजपाने गृहखाते आपल्याकडे ठेवले होते. मनोहर जोशी किंवा नारायण राणे मुख्यमंत्री असताना गृहखाते हे भाजपाचे नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे होते.

२०१४ ते २०१९ या पहिल्या कारकार्दीत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाही त्यांनी गृहखाते युतीतील मित्रपक्षाला (अविभाजित शिवसेनेला) दिले नव्हते.

शिवसेनेत जून २०२२ मध्ये मोठे बंड झाल्यावर भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद उदारपणे दिले पण गृहखाते भाजपाने आपल्याकडे म्हणजे देवेंद्र फडणवीसांकडे ठेवले होते. आता ते मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे हे गृहमंत्रीपदासाठी हटून बसले होते. हे खाते किती महत्त्वाचे आहे हे त्यांनाही चांगले ठाऊक आहे. उद्धव ठाकरे हे मुख्यंमत्री असताना त्यांनी गृहखाते मित्रपक्षाला दिले होते, त्याचा परिणाम त्यांच्या पक्षात ४० आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवला व सरकारला धोका निर्माण झाला याचे गांभीर्य त्यांना समजले नाही. म्हणूनच नव्या सरकारमध्ये मुख्यमंत्रीपदाबरोबरच गृहखाते भाजपाने आपल्याकडे ठेवले आहे, हा पक्षाचा सूज्ञ निर्णय म्हणावा लागेल. मुख्यमंत्रीपद गमावावे लागले म्हणून एकनाथ शिंदे नाराज झाले हे काही लपून राहिलेले नाही. सरकार स्थापनेच्या वेळी त्यांच्या आजारपणाची चर्चा जास्त झाली. सर्वाधिक आमदार असताना भाजपा ५७ आमदार असलेल्या पक्षाला मुख्यमंत्रीपद देईल तरी कसे? निकालाच्या पहिल्या दिवशीच भाजपाने मुख्यमंत्री ठरवावा असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले असते, तर पुढे कथ्याकूट झाला नसता. तरीही फडणवीसांनी सर्व परिस्थिती संयमाने हाताळली व त्यांना उपमुख्यमंत्रीपद देताना त्यांच्या आवडीचे नगरविकास व त्याच्या जोडीला गृहनिर्माण हे महत्त्वाचे खातेही दिले.

अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार निवडून आले व त्यांनी तत्काळ भाजपाला पाठिंबा जाहीर करून मुत्सद्दीपणा दाखवला. त्यांनाही त्यांच्या पसंतीचे अर्थ व नियोजन खाते नव्या सरकारमध्ये देण्यात आले आहे. विधानसभा निवडणूक काळात सर्वांचे लक्ष सिंधुदुर्ग जिल्ह्याकडे होते. माजी केंद्रीयमंत्री व खासदार नारायण राणे यांचे नितेश व निलेश हे दोन्ही पुत्र निवडणुकीच्या मैदानात होते. नितेश यांनी भाजपाचे उमेदवार म्हणून व निलेश यांनी शिवसेनेचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. दोन्ही भावांचा जनसंपर्क व सार्वजनिक कार्य मोठे आहे, गावागावांत-वाडीवस्तीवर त्यांचा संपर्क आहे, त्याचा लाभ त्यांना व त्यांच्या पक्षाला झाला. मतदारांनी राणे बंधूंना मोठ्या मताधिक्याने विधानसभेवर पाठवले. नितेश राणे मंत्री होणार हे सर्वांनाच अपेक्षित होते. त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट मंत्रीपद दिले. शिवाय त्यांना मत्स्य व बंदरे हे कोकणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले खाते देऊन त्यांच्या कार्याचा त्यांनी गौरवच केला. नागपूर अधिवेशन संपल्यावर नितेश राणे रविवारी त्यांच्या मतदारसंघात गेले तेव्हा त्यांचे जे अभूतपूर्व स्वागत झाले, यावरून त्यांची लोकप्रियता किती उत्तुंग आहे हे सर्व महाराष्ट्राने बघितले.

मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर ज्यांना वगळले किंवा ज्या इच्छुकांना संधी मिळाली नाही अशा डझनभर नाराजांची खदखद प्रकट झाली. यापूर्वीही अनेकांना नाराज व्हावे लागले आहे, पण कोणी मीडियासमोर येऊन टाहो फोडताना दिसले नव्हते.

# डॉ शोभा गायकवाड यांच्या मनाच्या कोंदणी

*कविता संग्रहाच्या निमित्ताने. मनाच्या कोंदणी- मनाच्या कोंदणात जपलेल्या, साठवलेल्या भाव-भावनांनी, अनुभवांनी सजलेली कविता.*

*डॉ. शोभाताई गायकवाड यांचा 'मनाच्या कोंदणी' कविता संग्रह वाचून झाला आणि पंचपक्वानाच्या पाहुणचारानंतर तृप्ततेची ढेकर द्यावी तशी अनुभूती आली. मनाच्या कोंदणात जपलेल्या, साठवलेल्या भाव-भावना, जीवन जगतांना येणाऱ्या विविधांगी अनुभवांनी शोभाताईंची कविता सजलेली आहे. बहुविध विषयांवरील दर्जेदार कविता एकाच संग्रहात वाचायला मिळणे म्हणजे वाचकांसाठी एक मेजवाणीच आहे.*

*मनाच्या कोंदणी' काव्यसंग्रहाचे एक खास वैशिष्ट्य आहे. ते वैशिष्ट्य म्हणजे या संग्रहाची सुरुवात 'प्रिय सौ. शोभास' या स्वर्गिय राजाभाऊ गायकवाड म्हणजेच डॉ. शोभाताईंचे यजमान यांच्या कवितेने झाली.*


*कसब तुज सर्व आघाडी सांभाळण्याचे पाहता तुज, तू हिरकणी भासून जावे*

*डॉ. शोभाताईंचे व्यक्तित्व अगदी समर्पक शब्दांत त्यांच्या यजमानांनी शब्दांकित केलेले आहे. त्यावरून वाचकास डॉ. शोभाताईंच्या कर्तृत्वाची प्रचिती येते.*

*डॉ. शोभाताईंच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाची छबी त्यांच्या काव्यांतून दिसून येते म्हणूनच बहुआयामी आशयाच्या कविता आपणास मनाच्या कोंदणीच्या पानापानांत भेटतात. डॉ शोभाताईंनी 'मनाच्या कोंदणीत' या काव्यसंग्रहात विविध रंगाच्या भावनांनी सजलेली. नव्याण्णव शब्दफुलांची सुंगधी, मनाला मोहवून टाकणारी, शब्दमाळ गुंफलेली आहे. या शब्दमाळेतील प्रथम पुष्प, शोभाताईंनी त्यांच्या मुलांसाठी दिलेल्या शुभेच्छांनी गुंफलेले आहे. दुसरे पुष्प ' जय कविते' गुंफतांना त्या त्यांची कविता रसिक वाचकांना अर्पण करून कवितेचा जयजयकार करतात. कविच्या लेखनीतून जन्मलेली कविता, रसिक वाचकांच्या हातात गेल्यावर, ती कविता केवळ त्या कवीची नसते श्र तर ती कविता सर्वांची असते हा संस्कारही डॉ. शोभाताई या कवितेतून समाजमनावर रुजवतात. ' जीवन' या कवितेतून अतिशय सुरेख, सरल भाषेत जीवन म्हणजे काय? समजावून सांगताना डॉ शोभाताई म्हणतात,*

*जीवन नेमून दिलेले रंगभूमीवरील पात्रजीवन आयुष्यरूपी वर्तमानपत्रातील घटनाचक्र जगतांना प्रत्येक वळणावर ठेवावे भाननियतीच्या दणक्याने कंठाशी येतो प्राण*

*जीवनाची व्याख्या करतांना*




*जीवन म्हणजे काय सांगून जीवन जगतांना प्रत्येक वळणावर भान असावे हा आपुलकीचा सल्लाही शोभाताई त्यांच्या प्रिय वाचकांना देतात.*

*यशस्वी जीवनवाट चालतांना शोभाताई ईश्वराला विसरल्या नाहीत. मातीशी नातं जपणाऱ्या शोभाताई काव्यपुष्प गुंफतांना ईश्वराच्या चरणी 'दाता' या रचनेत काव्यपुष्प अर्पण करतांना दिसतात. संवेदनशील मनाच्या शोभाताईंच्या कवितेत ईश्वर, कुटुंब, समाज सारं काही समावलेलं आहे म्हणूनच बालकांवर संस्कार करणाऱ्या संस्कारशील कविता मनाच्या कोंदणीत वाचकांना भेटते. तसेच मनाच्या कोंदणीत समावलेली आहे प्रौढांनाही हिताच्या गोष्टी सांगणारी कविता. स्त्रीविषयक समस्यांना न्याय देणारी कविता. तद्वतच अन्यायी सामाजिक परंपरांना विरोध करणारी कविता. आठवणींचा हिंदोळ्यावर झोके घेत गतकाळात रमणारी कविताही या संग्रहात आपणास भेटते. कष्टकरी बळीराजालाही मनाच्या कोंदणीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्याची व्यथाही शोभाताईंच्या संवेदनशील लेखणीतून समाजापर्यंत पोहचते. प्रेम, विरह ह्याही भावनांना शोभाताईंची लेखणी स्पर्श करतांना दिसून येते. एकंदरीत संवेदशील, सजग मनाच्या डॉ.शोभा ताईंनी मनाच्या कोंदणी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या भावनां, अनुभव अलगदपणे जपून ठेवलेले आहेत. तेच अनुभव, तरल भावना, भावज्ञानाचा साज चढवून त्यांच्या लेखणीतून कवितेच्या रुपांत प्रकट झालेल्या आहेत. उच्चशिक्षित प्रतिभावंत साहित्यिक डॉ. शोभाताई यांचा' मनाच्या कोंदणी ' काव्यसंग्रह वाचकांना जीवन जगतांना दिशादर्शक तसेच नवीन पिढीला जगण्याची ऊर्जा पुरविणारा असा आहे. डॉ.शोभाताईंच्या ' मनाच्या कोंदणी ' या कवितासंग्रहास लाख लाख शुभेच्छा तसेच ताईंचे अभिनंदन!*

**डॉ. नीता प्रफुल्ल कचवे**

# अवकाळी पाऊसग्रस्त डाळींब बागेची काळजी कशी घ्याल? वाचा सविस्तर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

सद्यस्थितीत या आठवड्यात पावसाची शक्यता (ठरळप) वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे पाऊस, वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पिकांचे संरक्षण महत्वाचे आहे. त्यानुसार डाळिंब बागेतील(ऊश्रळाल ऋीा) जास्तीचे पाणी काढून टाकावे व जमिनीवर पडलेला काडीकचरा, पालापाचोळा व खराब / सडलेली फळे गोळाकरून नष्ट करून बागेला स्वच्छ ठेवावे, यासह कोणत्या उपाययोजना कराव्यात, हे जाणून घेऊयात....

अवकाळी पाऊसग्रस्त बागेचे व्यवस्थापन

अवकाळी पाऊसग्रस्त बागेचे व्यवस्थापन फुलधारणा, फळधारणेस सुरुवात प्रादुर्भावित, इजा झालेल्या फुलकळ्या किंवा फळे काढून टाकावीत.

शिफारशीप्रमाणे फवारणी, अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे.

अधिक फुल आणि फळधारणेसाठी थोडीशी वाट पहावी.

समाधानकारक फुले व फळधारणा दिसल्यास शिफारशीप्रमाणे एकात्मिक रोग-कीड व्यवस्थापन करून बहर चालू ठेवावा.




अन्यथा बाग विश्रांतीवर ठेवावी. पुढील पीक हंगामासाठी, बहराची तयारी करावी.

सर्व फळांचे नुकसान, फांद्या तुटणे / चिरणे सर्व नुकसानग्रस्त फळे काढावीत.

तुटलेल्या, चिरलेल्या फांद्या छाटून बागेबाहेर खड्डयामध्ये कुजण्यासाठी टाकाव्यात.

छाटलेल्या फांद्या, खोडांवर बोर्डो पेस्ट लावावी.

त्यानंतर १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.

खतांचा हलका डोस भरून बागेला विश्रांती अवस्थेत ठेवावे.

पुढील बहराची तयारी करावी.

विश्रांती अवस्थेतील बाग

विश्रांती अवस्थेतील बाग सर्व नुकसानग्रस्त, तुटलेल्या, चिरलेल्या फांद्या छाटाव्यात.

बागेबाहेर खड्ड्यामध्ये कुजण्यासाठी टाकाव्यात. छाटलेल्या फांद्यांना, खोडांवर बोर्डो पेस्ट लावावी.

त्यानंतर १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.

विश्रांती अवस्थेत खत व्यवस्थापन केले नसल्यास खतांचा डोस देऊन घ्यावा.

शिफारशीप्रमाणे विश्रांती अवस्थेतील एकात्मिक रोग- कीड व्यवस्थापन करावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र इगतपुरी




## काळ्या-पिवळ्या-लाल की हिरव्या, कोणत्या मनुका खाणं जास्त फांयद्याचं? मनुका-बेदाणे खावे नक्की कधी?


**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

ड्रायफ्रुटस मधील 'मनुका' लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच अगदी आवडीने खातात. वेगवेगळ्या प्रकारच्या गोड पदार्थांमध्ये देखील आपण सुकामेवा म्हणून 'मनुका' घालतो. हेल्दी आणि निरोगी लाईफस्टाईलसाठी रोजच्या डाएटमध्ये आहारासोबत रोज मूठभर (थहळलह ठळ-ेळप ळी क्षशरश्रींहळशीीं) ड्रायफ्रूट्स खाणे फायदेशीर मानले आहेत. मनुक्यामध्ये लोह, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अधिक फायदेशीर असतात.

साधारणतः आपण पाहिले तर मनुक्यांच्या रंगांनुसार त्यांचे वेगवेगळे असे चार प्रकार असतात. बाजारात काळे, पिवळे, लाल, हिरवे इतक्या रंगांचे मनुके सहज विकत मिळतात. परंतु या सर्व मनुकांमध्ये कोणत्या रंगाच्या मनुक्यात कोणते गुणधर्म असतात आणि नक्की कोणता मनुका आपल्या आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर मानला जातो, याबद्दल आपल्याला फारशी माहिती नसते. हिरवे, पिवळे, लाल आणि काळे मनुके यांच्यातील पोषक तत्व आणि पौष्टिकतेचे गुणधर्म भिन्न असतात, त्यामुळे आवडीने रोज मनुके खात असाल परंतु त्यातील कोणत्या रंगाचे मनुके आपल्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहेत ते पाहूयात.

रंगानुसार मनुक्यांमध्ये कोणते गुणधर्म असतात ?

१. हिरवे मनुका :- हिरवे मनुके हे हिरव्या द्राक्षांपासून तयार करतात. द्राक्षांच्या लांबी आणि जाडीवरून मनुक्यांचा आकार आणि चव बदलू शकते. हिरव्या मनुक्यांमध्ये भरपूर प्रमाणात लोह, अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी असते. या पोषक तत्वांमुळे शरीराला ऊर्जा तर मिळतेच, मात्र मानसिक आरोग्यातही सुधारणा होते.



२. पिवळा मनुका :- पिवळा किंवा सोनेरी रंगाप्रमाणे दिसणारा मनुका हा चवीला गोड असतो. त्यामुळे विविध खाद्यपदार्थांमध्ये या मनुक्यांचा वापर जास्त होतो. विविध प्रकारच्या द्राक्षांपासून हे मनुके तयार केले जाते. पिवळ्या मनुक्यांचे देखील अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. पिवळे मनुके गोड असल्याने त्यात नैसर्गिक साखरचं प्रमाण अधिक असतं. मात्र असं असलं तरीही यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. पचनक्रिया सुधारण्यासाठीही पिवळे मनुके फायद्याचे आहेत.

३. लाल मनुका :- लाल द्राक्षापासून लाल मनुके तयार होतात. जशी लाल द्राक्षांची चव ही आंबट गोड असते तशीच लाल मनुक्यांचीही चव बदलत जाते. लाल मनुक्यांमध्ये लोह, पोटॅशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन सी, फायबर आणि इतर आवश्यक पोषक तत्वे असतात. लाल मनुक्यातल्या लोहामुळे रक्त शुद्ध व्हायला आणि वाढायला मदत होते तर व्हिटॅमिन सीमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

# नववर्षोत्सवानिमित्त चिखलदरा येथील वाहतूक मार्गात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती, -** जिल्ह्यातील चिखलदरा हे थंड हवेचे पर्यटन स्थळ असून दि. ३१ डिसेंबर रोजी अमरावती जिल्ह्यातील व आजूबाजूच्या जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक चिखलदरा येथे नववर्ष उत्सव साजरा करण्यासाठी येतात. या पार्श्वभूमीवर दि. ३१ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ दरम्यान परतवाडा ते चिखलदरा मार्ग हा अरुंद व घाटवळणाचा असल्याने तेथे वाहनांची गर्दी होऊन वाहतूक खोळंबण्याची व अपघात होण्याची शक्यता असते. मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अन्वये या कालावधीत वाहतुकीचे नियमन योग्य प्रकारे



करता यावे, यासाठी दि. ३१ डिसेंबर २०२४ ला सकाळी ८ वाजेपासून दि. १ जानेवारी २०२५ ला सायंकाळी ६ वाजेपर्यंत परतवाडा ते धामणगाव मार्गे चिखलदरा हा रस्ता जाण्यासाठी तसेच चिखलदरा, घटांग मार्गे परतवाडा हा रस्त येण्यासाठी या मार्गाची वाहतूक एकमार्गी करण्यात येत आहे. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द मोटार वाहन कायदा १९८८ व मुंबई पोलीस कायदा १९५१ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत.

# 'महाबीज'कडून भागधारकांना ३० टक्के लाभांश जाहीर

## गतवर्षी झाली पाच लाख ७६ हजार क्विंटल बियाणे विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला, -** राज्यातील शेतक-यांना चांगले बियाणे रास्त दरात मिळण्याचे उद्दिष्ट बाळगून 'महाबीज'ची वाटचाल सुरू असून, २०२३-२४ या वर्षातील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात एकूण पाच लाख ७६ हजार २१९ क्विंटल बियाणे विक्री झाली आहे.

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालय येथील डॉ. के. आर. ठाकरे सभागृहात शनिवारी झाली, सभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे कृषी आयुक्त रावसाहेब भागडे होते. महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर, संचालक वल्लभराव देशमुख, डॉ रणजित सपकाळ, कृषी विद्यापिठाचे प्रतिनीधी विठ्ठल सरप पाटील, शासनाचे प्रतिनिधी रामदास सिध्दभट्टी, राष्ट्रीय बीज निगमचे हेमंत चिरमूरकर व महाबीजे विभाग प्रमुख उपस्थित होते.

'महाबीज'तर्फे २०२३-२४ या वर्षात सुमारे पावणेसहा क्विंटल बियाणे विक्री झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात महाबीजची एकूण आर्थिक उलाढाल ५३७ कोटी ७४ लक्ष रुपये आहे. महाबीजच्या इतिहासातील सर्वाधिक ३० टक्के लाभांश भागधारकांना जाहीर करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाकडे मागील तीन वर्षांपासून शासनाकडून थकित असलेले



३३.८७ कोटी बीजोत्पादन अनुदानाबाबतचे काम मार्गी लागल्याबाबत महाबीजच्या भागधारकांनी समाधान व्यक्त केले.

सभास्थळी महाबीजच्या वतिने भागधारकांना महाबीज कृषी उत्पादनांची माहिती

## स्व. नानासाहेब सपकाळ यांच्या तैलचित्राचे अनावरण

होण्याकरिता विविध दालने थाटण्यात आली होती. त्यामध्ये ऊती संवर्धित केळी, संकरित पपई, मका, चारा पिके खरिप/ रब्बी हंगामातील पिक बाण, भाजीपाला वियाणे व प्रात्यक्षीक व माहिती सादर करण्यात आली.

व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर आणि आयुक्त (कृषी) रावसाहेब भागडे यांनी बीजोत्पादक भागधारकांच्या समस्या जाणून घेतल्या. संचालक वल्लभराव देशमुख व संचालक डॉ रणजीत सपकाळ यांनी भागधारकांच्या समस्येवर मार्गदर्शन करुन बीजोत्पादक भागधारकांचे समाधान केले संचालन जितेंद्र सरोदे यांनी केले तर आभार विवेक ठाकरे यांनी मानले.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण

# हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई –** राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर – सिंह, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो.

पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत काम सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर चालविण्यात येतील.

या कार्यक्रमाला उंबर्डा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यातील उंबर्डा येतील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट आहे. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार आहे. धाराशीव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील प्रकल्प २ मेगावॅट क्षमतेचा आहे. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. वाशिम आणि धाराशीव जिल्ह्यातील एक – एक सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प यापूर्वीच सुरू झाले आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतील पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत राज्यात नोव्हेंबर अखेर १५,७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १,३०,४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री अशा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी अनेक दशकांची मागणी आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली.

या योजनेत राज्यभरात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून विकेंद्रीत स्वरुपात कृषी फीडर्सना विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल तसेच या योजनेत किफायतशीर दरात वीज मिळाल्यामुळे राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल.


# मोर्शी-वरुड - पुसला अपुर्ण रस्त्याचे कामास वनविभागाची मंजूरी

## प्रधान मुख्य वनरक्षक नागपूर यांचे आदेश

### आमदार उमेश यावलकर यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५वरुड –** अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील नांदगांव पेठ – मोर्शी–वरुड– पांढुर्णा (महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमा राष्ट्रीय महामार्ग ३५३ के) या वनक्षेत्रामधून जात असलेल्या रस्त्याचे अस्तीत्वात असलेल्या रुंदीमध्ये दुरुस्ती व मजबूतीकरणास वन्यजीव मान्यता मिळण्यासंदर्भात सातत्याने आमदार उमेश यावलकर यांनी केंद्रीय सडक व परीवहन मंत्री नितीनजी गडकरी यांचेकडे सदर्हू रस्त्याबाबत पाठपुरावा केला. दरम्यान हा रस्ता गेल्या ८ वर्षापासून रखडला असल्याचे लक्षात आणून दिले.





सदर्हू रखडेल्या रस्त्यामुळे अनेक अपघात घडून मानव जिवित हाणी झाली असल्याने नागरीकांनी अनेक वेळा त्या रस्त्यासंदर्भात निवेदन देवून आंदोलने केलीत. या रस्त्याचे गांभिर्याने दखल घेऊन आमदार उमेश यावलकर यांनी सडक व परिवहन मंत्री श्री नितीनजी गडकरी यांचे सबब बाब निदर्शनास आणून दिले. यावेळी त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना तातडीणे आदेश देऊन उपाययोजना करण्याचे सुचित केले असता दिनांक २३/१२/२०२४ रोजी प्रधान मुख्य वनरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालयाचे पत्र कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग यांना प्राप्त झाले. तसेच दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी मुख्यवनसंरक्षक प्रादेशीक यांचे पत्रानुसार महेंद्री संवर्धन राखीव क्षेत्रातून जात असलेल्या ४.५५ कि.मी. रस्त्याचे अस्तित्वातील रुदीमध्ये दुरुस्ती व मजबूतीकरण करणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यासोबतच मोर्शी ते वरुड रस्त्यादरम्यान असलेले राखीव जमिणीवरील रस्त्याचे दुरुस्ती करण्याबाबत नाहरकत देण्यात आल्याने आता लवकरच रस्त्याचे कामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे या परीसरातील नागरीकांनी समाधान व्यक्त केले असून आमदार उमेश यावलकर यांचे आभार व्यक्त केले आहे.

# पिंक ई-रिक्षाच्या लाभासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा -जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## जिल्हाधिकारी कार्यालयात पिंक ई रिक्षाचे प्रात्यक्षिक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती,**

पिंक ई–रिक्षा योजनेतून महिला व मुलींना रोजगार प्राप्त होणार आहे. यातून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होवून महिला व मुलींना सुरक्षित प्रवासाची हमी मिळणार आहे. या योजनेत राज्य शासनाकडून २० टक्के अनुदान मिळणार आहे. यासाठी इच्छुक महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे केले.





जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पिंक इ रिक्क्षाचे प्रत्यक्ष सादरीकरण जिल्हाधिकारी श्री. कटियार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी रिना ढोमणे या महिलेने जिल्हाधिकारी श्री. कटियार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, महिला व बाल विकास अधिकारी उमेश टेकाळे आणि जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे यांना ई रिक्षात बसवून वाहन चालविले. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी या महिलेचे कौतुक करुन पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत आतापर्यंत ५८ अर्ज मंजूर करण्यात आले आहे. अर्जांची छानणी प्रक्रिया सुरु आहे. महिला व बालविकास विभागातर्फे शहर आणि ग्रामीण भागातील गरजू महिलांना अनुदानावर पिंक ई रिक्षा देण्यात येणार आहे. पिंक ई–रिक्षा योजनेतून महिला व मुलींच्या रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुर्नवसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, स्त्री सशक्तीकरणास चालना देणे, महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी नोकरी, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. कायनेटिक कंपनीच्या माध्यमातून महिलांना परवाना, परमिट, बॅच बिल्ला, प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

योजनेत ई–रिक्षाची किंमतीमध्ये जीएसटी, रजिस्ट्रेशन, रोड टॅक्स आदी करांचा समावेश राहणार आहे. नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, अनुज्ञेय असलेल्या खासगी बँकाकडून ई–रिक्षा किंमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल, योजनेची लाभार्थी महिला–मुली यांना १० टक्के स्वहिस्सा भरावा लागणार आहे. कर्जाची परतफेड करण्यासाठी ५ वर्षे मुदत राहणार आहे.

लाभार्थीचे कुटुंब ...ष्ट्रातील रहिवासी असणे ...यक आहे. अर्जदाराचे वय ... ४० वर्षे असावे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्र प्राप्त युवती, अनुरक्षणगृह बालगृहातील आजी–माजी प्रवेशितांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दारिद्र्य रेषेखालील महिलांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे.

लाभार्थींना योजनेसाठी अर्ज, आधार कार्ड, पॅन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, कुटुंबप्रमुखाचा तीन लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, मतदान ओळखपत्र, राशन कार्ड, महिला स्वत: रिक्षा चालवण्याचे हमीपत्र, महिलेचे बँक कर्ज नसल्याचे हमीपत्र, अटी व शर्ती पालन करण्याचे हमीपत्र द्यावे लागणार आहे.

योजनेसाठी महिला व बाल विकास भवन, कॅम्प रोड, अमरावती, समाज विकास अधिकारी महानगरपालिका, अमरावती, कार्यक्रम व्यवस्थापक, नरेगा, जिल्हा परिषद अमरावती, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, नागरी, अमरावती, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, ग्रामीण, गटविकास अधिकारी कार्यालय, मुख्याधिकारी, नगरपालिका, नगर पंचायत, लोक संचालित समूह साधन केंद्र, सखी वन स्टॉप सेंटर, जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अमरावती याठिकाणी अर्ज करता येणार आहे.

योजनेचा लाभ एकदाच घेता येणार आहे, शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेतलेला नसावा, महिला कर्ज घेण्यास पात्र असावी, परतफेडची जबाबदारी महिलेची राहणार आहे. योजनेसाठी महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी केले आहे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती, –** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.



दौऱ्यानुसार, श्री. गडकरी यांचे शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.१० वाजता बेलोरा विमानतळ येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ९.५० पर्यंत राखीव राहिल. सकाळी १० वाजता श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे आयोजित डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख पुरस्कार कार्यक्रमास उपस्थित राहतील. सकाळी ११.३० वाजता नागपूर–अमरावती बीओटी प्रकल्पाबाबत बैठक घेतील. सकाळी ११.२५० वाजता नूतन विदर्भ शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी १२.४० वाजता बेलोरा विमानतळ येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

# सुशासन सप्ताहात एक कोटीवर अर्ज निकाली

***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.२५अमरावती–*** *माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या स्मरणार्थ दि. १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह अभियान घेण्यात आले. यात एक कोटीवर अर्ज निकाली काढण्यात आले आहे.*

*जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. यात आपले सरकार आणि पीजी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी निकाली काढण्यात येत आहे. आपले सरकार पोर्टलवरील २ हजार ७७२ तक्रारी आणि पीजी पोर्टलवरील ४७५ प्रकरणांचे निराकरण करण्यात आले. जिल्ह्यातील एकूण ३८ विभागाकडून ७७० सेवांचे एकूण १ कोटी ७ लाख ६६ हजार ३४२ अर्ज प्राप्त आहे. यापैकी १ कोटी ४ लाख २९ हजार २९ अर्ज निकाली काढले आहेत. यात महसूल विभागाकडून १४ हजार १५० अर्ज निकाली काढले आहे.*

*शासन पद्धती, नवकल्पना आणि प्रतिकृती उपक्रम, ओळख, पदोन्नती आणि सर्वोत्तम दस्तऐवजीकरण सराव, नागरीकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी 'प्रशासन आपल्या दारी' मोहीम घेणे, प्रशासनाच्या माध्यमातून तळागाळातील नागरिकांपर्यंत 'प्रशासन गाव की ओर' मोहीम राबविणे ही सुशासन सप्ताह अभियानाची उद्दिष्टे आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दि. १७ डिसेंबर रोजी तयारीचा आढावा घेतला. तसेच सोमवार, दि.२३ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी मनिष फुलझेले यांनी सादरीकरण केले.*


# विद्यापीठ परिसरात बिबट्याची दहशत

## बिबट्याच्या बछड्याचा सुरक्षारक्षकावर हल्ल्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** विद्यापीठ परिसरात मंगळवारी (ता. २४) सकाळी बिबट्याच्या बछड्याने एका सुरक्षा रक्षकावर हल्ल्याचा प्रयत्न केला. परंतु सुरक्षा रक्षकाने स्वतःचा बचाव करीत वनविभागाला माहिती दिली. वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने परिसरातून ह बिबट्याच्या बछड्याला रेस्क्यू करून वडाळी वनपरिक्षेत्र येथे सुरक्षीत ठेवले.

विद्यापीठाच्या मागच्या बाजूला जंगल परिसरात बिबट नेहमीच वावरतात. यापूर्वीसुध्दा विद्यापीठ परिसरात बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातला होता. त्यामुळे विद्यापीठ परिसरात मॉर्निंग वॉक करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. विद्यापीठाच्या मागच्या बाजुला तारेचे कंपाउंड असल्यामुळे नेहमीच वन्यप्राणी विद्यापीठ परिसरात दिसतात. मंगळवारी सकाळी विद्यापीठामधील गेस्ट हाऊस परिसरात सुरक्षा कर्मचारी ड्युटीवर तेनात असतांना अचानकबिबट्याच्या बछड्याने त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला. परंतु सुरक्षा रक्षकाने स्वतःचा बचाव करीत आरडाओरडा केली असता बिबटचे बछडे गेस्ट हाऊस लगतच्या जंगल परिसरात पळून गेले. सुरक्षा रक्षकांनी वरिष्ठांना माहिती दिली आणि त्यांनी वनविभागाला दिली. वनविभागाचे रेस्क्यू पथक पिंजरा घेऊन विद्यापीठ परिसरात पोहचले आणि बिबट्याच्या पिल्ल्याची





पाहणी केली. दुपारी २ च्या सुमारास गेस्ट हाऊसच्या बिबट्याचे बछडे दिसताच त्याला रेस्क्यू करून वडाळी येथील वनपरिक्षेत्रात ठेवले.रात्रीला मादी बिबटसोबत बछडे विद्यापीठ परिसरात आले असावे आणि परत जाताना पछड्याला तारेच्या कंपाऊंडमधून जाता आले नाही. त्यामुळे बछडे विद्यापीठ परिसरात राहिले. रेस्क्यू केलेले बछडे सात ते आठ महिन्याचे असावे, असे संबंधीत अधिकाऱ्यांनी सांगितले.–

# धर्मदाय सह आयुक्त, अमरावती विभागीय कार्यालयाचे शहराबाहेर होणारे स्थलांतर थांबवावे

## महाराष्ट्र मंदिर महासंघाची मागणी

### संस्था नोंदणी कार्यालय शहराबाहेर स्थलांतरित झाल्यास मंदिरासह बहुउद्देशीय संस्थांना सुध्दा होणार त्रास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती,**धर्मदाय सह आयुक्त, अमरावती विभागीय कार्यालयाचे अमरावती शहराबाहेर होणारे स्थलांतर रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे. या संदर्भात मा *. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, तसेच कॅबिनेट मंत्री श्री. भरतसेठ गोगावले यांना नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात निवेदन देण्यात आले आहे.सध्या अमरावती येथील धर्मदाय प्राधिकरणाचे विभागीय व जिल्हा कार्यालय मालटेकडी जवळील म्हाडा कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर कार्यरत आहे. परंतु, नव्याने अमरावती विद्यापीठाच्या मागील मार्डी रोड परिसरातील जागेत कार्यालय स्थापन करण्याची योजना समोर आली आहे. ही जागा वन विभागाच्या जमीनीला लागून व तलावाजवळ असल्य़ाने आणि वन्य प्राण्यांच्या वर्दळीच्या जवळ असल्याने, कार्यालयासाठी ही जागा अयोग्य असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. शहराबाहेरील प्रस्तावित ठिकाणी कार्यालय हलविल्यास, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम, अकोला आणि अमरावती जिल्ह्यातील संस्थांचे विश्वस्त व संबंधित व्यक्तींना कार्यालयात जाणे येणे त्रासदायक होईल. सदर कार्यालय सध्या गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालया तील दुसऱ्या मजल्यावर असून या इमारतीमधील म्हाडा कार्यालय हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. त्यामुळे म्हाडा कार्यालयाच्या सध्याच्या इमारतीत उपलब्ध होणारे दोन मजले धर्मदाय आयुक्त विभागीय कार्यालयासाठी हस्तांतरित केल्यास, कमी खर्चात कार्यालयाचे व्यवस्थापन होऊ शकेल. यामुळे पाचही जिल्ह्यांतील मंदिर विश्वस्त व संस्था संबंधित व्यक्तींना सोयीचे होईल.महाराष्ट्र मंदिर महासंघाने शासनाला अमरावती शहरातील अन्य शासकीय जागांमध्ये कार्यालय उभारण्याचा विचार करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, म्हाडा कार्यालयातील दोन मजले धर्मदाय सह आयुक्त कार्यालयासाठी देण्यात यावेत, अशी विनंती महासंघाने केली आहे.

या मागणीसाठी महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री सुनील घनवट, राज्य पदाधिकारी श्री अनुप जयस्वाल यांनी पुढाकार घेतला असून, दिलेल्या निवेदनावर मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदनातील मागणी योग्य असल्याचे सांगून पुढील योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

# वाईट विसरने हाच मानवी स्मृती चा गाभार्थ आहे : अॅड. दिपक श्रीमाळी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** विश्वातील सर्व प्राणी मात्रात फक्त मनुष्य या जीवालाच परमेश्वराने स्मृती दिलेली आहे या स्मृतीचा वापर मानवाने कटू वाईट अनुभव विसरण्या साठी केला तर तो अधिक आनंदाचे जीवन जगू शकतो. वाईट विसरून जाने हा आपल्या स्मृतीचा खरा अर्थ आहे. असे विचार अँड.दिपक श्रीमाळी यांनी व्यक्त केलेत. अमरावती जिल्हा वकील संघा ने आयोजित केलेल्या रोझेस इन डिसेंबर या व्याख्यान मालेचे व्दितीय पुष्प गुंफतांना अँड.दिपक श्रीमाळी बोलत होते.

मानवाला परमेश्वर निसर्गा ने स्मरणशक्ती दिली आहे या मुख्य बळावर आजवर मानवी विकास झालेला आपण बघत आहोत. पण याच बरोबर याच स्मृती मुळे माणूस दु:खाची सुध्दा साठवन करीत असतो हे दु:ख विनाशा कडे घेवून जाणारे असते .दु:ख अधिक वेळ मनात ठेवने हे प्रकृती नियमाने बरोबर नसते.

स्मृती मधून वाईट कटू आठवनी हया नेहमीच बाहेर काढून टाकल्या पाहिजेत म्हणजेच आनंदाने पुढे जाता येते. जे जे चांगले आहे ते स्विकार करून नेहमी पुढे गेले पाहिजे. आपल्या ४२ वर्ष प्रदीर्घ वकील सेवेतील बरेच अनुभव अँड. श्रीमाळी यांनी उपस्थित वकीलां समोर सांगीतले.

वकील क्षेत्र हे प्रचंड अभ्यास व मेहनतीचे क्षेत्र आहे. अभ्यास व मेहनत केल्या शिवाय वकीलांना काहीच मिळू शकत नाही. यासाठी वकीलांनी नेहमी अभ्यास करने अपेक्षीत आहे. बाहय जगाला वकील क्षेत्राचे नेहमीच आकर्षण राहत आलेले आहे. परंतु हे सर्व दूरून डोंगर साजरा या म्हणी प्रमाणे आहे. अतिशय मेहनतीचे हे क्षेत्र आहे. वकीलांनी आपल्या कामा बाबत नेहमीच प्रामाणिक रहायला हवे. या क्षेत्रातील अनुभवी लोक नेहमी तुम्हाला ज्ञान शिदोरी देत असतात . बाहेरचे ही चांगले मित्र आपण निर्माण केलेत तर वकीली क्षेत्रात अपयश येत नाही. कनिष्ट वकीलांनी मनपूर्वक अशिलाला आपली सेवा द्यावी. कुणाला ही कधी फसवे खोटे आश्वासन कधीच देवू नये.

बरेचदा प्रासंगिक आव्हान काम करतांना येतात त्यावर खंबीरपणे अभ्यासक बाण्याने मात करावी. कामा सोबतच या कार्यक्षेत्रात पैसा हा तुमचे कडे धावून येत असतो. वकीला बाबत लोकांचे अनेक चुकीचे गैरसमज आहेत. वकीलाच्या मेहनत व अभ्यासाची लोकांना माहिती नसते यामुळे ते गैरसमज असतात. जीवनात मागे जे काही घडले त्याला विसरून जीवनाचा आनंद नेहमी घेतला पाहिजे.

गुलाबाचे फुल ज्या प्रमाणे आनंद देत असते असाच आनंद आपणास ही देता आला पाहिजे.


अमरावती वकील संघाला कतृत्ववान नामवंत वकीलांची परंपरा लाभलेली आपण पाहलेली आहे.हाच वसा आजच्या वकीलांनी पुढे न्यावयाचा आहे. वकील क्षेत्रात आता अलीकडे अनेक संधी मुबलक प्रमाणात आहेत . याचा लाभ सुध्दा युवा वकीलांनी घेतला पाहिजे. वकील संघाचे अध्यक्ष अँड.विश्वास काळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अँड.दिपक श्रीमाळी यांचे विषयी बोलतांना काळया कोटातील संवेदनशिल मनाचा पितृतुल्य माणूस असे खास वर्णन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघ कार्यकारीनी सदस्य अँड. सुरज जामटे यांनी केले. तर अँड. सारीका ठाकरे यांनी आभार प्रदर्शन केले.

अँड.तेजस्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मंचकावर वकील संघ उपाध्यक्ष अँड.एन.डी.राऊत ,सचिव अँड.चंद्रसेन गुळसुंदरे ,ग्रंथालय सचिव वशीम शेख यांच्या सह कार्यकारीणी सदस्य हजर होते.

अमरावती जिल्हा वकील संघाचे मीडिया प्रभारी अँड.डॉ.रवी खडसे यांनी हे कळविले आहे.

# थंडीची लाट प्रतिकुल हवामानापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे - विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

## जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष २४७ कार्यान्वित ठेवावे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** हवामान खात्याच्या अंदाजानुसार २७ व २८ डिसेंबर दरम्यान विदर्भात मेघ गर्जनेसह वादळी वाऱ्यांचा पाऊस तसेच थंडीची लाट येणार असल्याचे वर्तविण्यात आले आहे. त्यानुषंगाने प्रतिकुल हवामानापासून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विभागातील सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी सतर्क राहून उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. जिल्ह्यात कुठेही आपातकालीन स्थिती उद्भल्यास त्याठिकाणी तत्काळ मदत व बचाव दल पोहचेल यादृष्टीने नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात थंडीची लाट प्रतिकुल हवामानाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय उपाययोजना संदर्भात सविस्तर आढावा डॉ. पाण्डेय यांनी आज घेतला. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून तसेच सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार सारंग ढोमसे प्रत्यक्षरित्या बैठकीला उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, हवामान खात्याकडून वादळी वाऱ्यांसह पाऊस व थंडीची लाट विदर्भात सर्वत्र येणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. त्यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी थंडीच्या लाटेपासून बचावासाठी उपाययोजना कराव्यात. शितलहरीच्या प्रभावापासून संरक्षणासाठी उपाययोजना नागरिकांना माहिती होण्यासाठी 'काय करावे व काय करु नये' याविषयी वृत्तपत्रातून व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

थंडीच्या लाटेपासून मनुष्य, पशुधन, शेतीपिकांचा बचाव करण्याबाबतही विविध उपाययोजनांची वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी. नागरिकांना तत्काळ बचाव सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हास्तरावरील नियंत्रण कक्ष २४७ कार्यान्वित करावे. तसेच सर्व संबंधितांचे संपर्क क्रमांकांची यादी क्षेत्रीय, तालुका कंट्रोल रुम व बचाव पथकातील कर्मचाऱ्यांना वितरीत करावी. जिल्ह्यातील सर्व क्षेत्रीय यंत्रणांनी मुख्यालयी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील आपदा मित्र व आपदा सखी यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत गावागावात थंडीच्या लाटेपासून बचावासाठी 'काय करावे व काय करु नये' याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

वादळी पावसामुळे झाडांचे नुकसान किंवा मोठी झाडे उन्मळून पडणे, फांद्या तुटणे यासाठी व वाहतुकीचा रस्ता पूर्ववत सुरु करण्यासाठी अग्निशमन विभागाचे पथक तयार ठेवावे. अवकाळी पाऊस तसेच थंडीची लाट, नैसर्गिक वीज यामुळे होणारी जिवीत हानी टाळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी. अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यांमुळे वीज खंडीत झाल्यास वीज वितरण कंपनीच्या यंत्रणांना सज्ज ठेवावे. वीज पुरवठा खंडीत झाल्यास त्याठिकाणी पथक पाठविण्यात यावे. जिल्हा शोध व बचाव पथके सर्व सोयी–सुविधांनिशी व बचाव साहित्यांसह २४ तास सज्ज ठेवावीत. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष २४७ कार्यान्वित ठेवावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

# कुंभमेळ्याला जायचंय? भाविकांसाठी रेल्वे आली धावून



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान कुंभमेळा होणार आहे. शाही स्नानांचे महत्त्वपूर्ण दिवस पौष पौर्णिमा, मकर संक्रांती, मौनी अमावस्या, वसंत पंचमी आणि महाशिवरात्री हे आहेत. या कुंभमेळ्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या पार्श्वभूमीव कुंभमेळ्याला जाण्यासाठी इच्छुक असलेल्या पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील भाविकांसाठी आता रेल्वे धावून आली आहे.

**विशेष गाड्या धावणार**

प्रयागराज येथील कुंभमेळादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन रेल्वेने विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन केले. नांदेड-पाटणा आणि काचीगुड–पाटणादरम्यान विशेष गाड्या चालवणार आहेत. या रेल्वे गाड्यांचा पश्चिम विदर्भ व मराठवाड्यातील भाविकांना चांगलाच लाभ होईल. अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन कुंभमेळ्यासाठी विशेष गाड्या सोडण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन अकोला मार्गे दोन विशेष साड्या सोडण्यात येणार आहेत.

# नांदगाव पेठ येथे २७ डिसेंबर पासून विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धा

## नेताजी क्रीडा मंडळाचे आयोजनआकर्षक बक्षिसांसह वैयक्तिक बक्षिसांची लयलूट

**दि.२५नांदगाव पेठ –** नेताजी क्रीडा मंडळाच्या वतीने २७ ते २९ डिसेंबर दरम्यान ग्रामपंचायतच्या प्रांगणात भव्य विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.६५ किलो आतील वजनाच्या या कबड्डी स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांसह वैयक्तिक बक्षिसांची लयलूट असणार आहे. या स्पर्धेला उदघाटक म्हणून भाजप प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख, भाजप जिल्हा सरचिटणीस विवेक गुल्हाने, पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांची उपस्थिती असणार आहे. छत्रपती श्री.शिवाजी महाराज चौक स्थित ग्रामपंचायत पटांगणावर कबड्डी स्पर्धा पार पडणार आहेत. विजेत्या संघास प्रथम बक्षीस स्व. हिराबाई गुल्हाने यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विवेक गुल्हाने यांच्या कडून ५१ हजार रुपये रोख देण्यात येणार आहे.जेपीएस होंडा यांच्या वतीने जुगलकिशोर



गट्टानी यांच्याकडून द्वितीय क्रमांकाचे ३१हजार रुपये रोख देण्यात येणार आहे तर तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस आकाश चिरडे तर्फे २१ हजार रुपये रोख देण्यात येणार आहे. याशिवाय वैयक्तिक बक्षिसे सुद्धा देण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी राहुल सुंदरकर, पवन जाधव, बंटी आमले, श्रीकांत पांढरीकर यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन नेताजी क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.क्रीडाप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सुद्धा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# २७-२८ डिसेंबर दरम्यान राज्यात मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** कालपासून राज्यातील विविध भागांमध्ये काही प्रमाणात आभाळी हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील दक्षिणेकडील तुरळक भाग ; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी ; आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश,



मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे) आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे.

या भागातील शेतकऱ्यांनी या पुढील कृषी सल्ला आणि हवामानच्या अंदाजाकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार उमेश यावलकर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णवाहीकेचे लोकार्पन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४वरुड –** स्थानिक मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांचे वाढदिवसामित्त नुकतेच आशा चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून रुग्णवाहीकेचे लोकार्पण करण्यात आले. वरुड मोर्शी तालुक्यातील रुग्णांची मोठ्याप्रमाणात गैरसोय निर्माण होत असल्याची बाब अनेक दिवसांपासून निदर्शनास होती. वरुड तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदीवासी दुर्गम भागातील रुग्णांना रुग्णवाहीकेअभावी अडचणींचा सामाना करावा लागत होता. नुकतेच रुग्णवाहीचे लोकार्पण झाल्याने आता रुग्णांना तातडीणे अमरावती किंवा नागपूर जाण्याकरीता सोईचे ठरणार आहे. लोकसेवेच्या आणि जनहिताच्या कामांना प्राथमिकतेने प्राधान्य देऊन सोडविण्याकरीता सतत प्रयत्नरत राहणार असल्याचेही आमदार उमेश यावलकर यांनी माध्यमांशी बोलतांना प्रतिक्रीया दिल्यात.

रुग्णवाहीका लोकार्पण व अभिष्टचिंतन सोहळ्यास मतदार संघातील नागरीकांनी सकाळपासून हजारो चाहत्यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्यात. याकार्यक्रमाप्रसंगी मतदार संघातील असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिमेस सुरूवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती,–** राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यातील सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम सोमवार, दि. २३ डिसेंबरपासून सुरूवात झाली आहे. मोहिमेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सदर मोहिम राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यातील सर्व क्षयरोग पथक अंतर्गत यापूर्वी निश्चित केलेल्या अतिजोखिमग्रस्त लोकसंख्येत कामासाठी स्थलांतरीत, तसेच खाणीमध्ये काम करणारे कामगार, बेघर, सामजिक गट, तसेच तुरूंग, वृद्धाश्रम, आश्रमशाळा व वसतिगृह, आदिवासी मुलांचे वसतिगृह, मनोरूग्णालय आदी ठिकाणी राबविण्यात येणार आहे. या शोध मोहिमेत आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन सर्व सदस्यांची क्षय रोगासंदर्भातील तपासणी करणार आहे. ग्रामीण भागातील तपासणी व सर्वेक्षण कामासाठी १२१ पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. मोहिमेचे पर्यवेक्षकांद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.सततचा खोकला, ताप, रात्री घाम येणे, वजनात लक्षणीय घट, भूक न लागणे, गेल्या ६ महिन्यात कधीही थुंकीत रक्त येणे, इतिहास, श्वास लागणे, मानेवर गाठ येणे किंवा फुफ्फुसाव्यतिरिक्त इतर लक्षणे, थकवा येणे आदी लक्षणे असणाऱ्या संशयित व्यक्तींची तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित व्यक्तींमध्ये लक्षणे आढळल्यास सदर व्यक्तीची तात्काळ थुंकी नमुने, क्ष–किरण, नॅट तपासणी करून तपासणीमध्ये क्षयरोग आढळून आल्यास रूग्णास क्षयरोगावरील औषधोपचार सुरू करण्यात येणार आहे. क्षयरोगाची तपासणी करून त्यामध्ये पॉझिटिव्ह आल्यास त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येणार आहे.ही मोहिम क्षयरोग नियंत्रणासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या टीममार्फत संशयित क्षयरूग्णांचा शोध घेऊन त्यांच्या क्षयरोगाबाबत चाचण्या करून त्याद्वारे आढळलेल्या क्षयरूग्णांना वेळेत उपचार करणे सोयीचे होईल. तसेच मोहिम यशस्वीरित्या राबविण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर या मोहिमेचे सनियंत्रण केल्या जाणार आहे. असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी कळविले आहे.

# नाताळनिमित्त आज जिल्ह्यातील सर्व चर्चमध्ये प्रार्थनासभा
## ख्रिसमसनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
ख्रिस्ती धर्मीयांचा पवित्र नाताळ उत्सव आज अमरावती जिह्यात सर्वत्र उत्सहात पार पडला यासाठी शहरातील विविध चर्च व ख्रिस्तिबांधवांची घरे आकाशदिवे, कंदील, रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने उजळून निघाली होती. जिल्ह्यातील सर्व चर्चमध्ये ख्रिसमसनिमित्त सकाळी प्रार्थनासभा आणि विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते।

प्रभू येशूंचा जन्मदिवस असलेला ख्रिसमस अर्थात नाताळ हा सण आज बुधवारी, २५ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला . या सणानिमित्त सजवले जाणारे ख्रिसमस ट्री, सांताक्लॉजचा पोषाख , गिफ्ट याचे लहानांसोबतच मोठ्यांनाही आकर्षण असते. नाताळासाठी ख्रिस्ती बांधवांनी जय्यत तयारी केली होती . शहरातील सर्व चर्चना रंगरंगोटी व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.. त्यामुळे सर्व चर्च प्रकाशाने उजळून निघाली आहे. बुधवारी, २५ डिसेंबरला सर्व चर्चमधून सकाळी ख्रिसमसनिमित्त प्रार्थनासभा झाली व त्यानंतर एकमेकांना ख्रिसमस च्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# महाराष्ट्रातील मतदार याद्यांत कोणताही घोळ झालेला नाही; काँग्रेसला ६० पानी उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नवी दिल्ली**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसने केलेले सर्व आरोप मंगळवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने फेटाळून लावले. जवळपास ५० मतदारसंघांत ५० हजारांपेक्षा अधिक नावे बेकायदेशीरपणे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट केल्याचा आरोप काँग्रेसने केला होता. मात्र, केंद्रीय निवडणूक दिलेल्या तब्बल ६० पानांच्या उत्तरात काँग्रेसचे सर्व आरोप मुद्देनिहाय फेटाळून लावले.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदार यादीत बेकायदेशीरपणे नावे जोडली गेली नाहीत किंवा वगळण्यात आली नाहीत. मतदार याद्यांमध्ये कोणताही घोळ झालेला नाही, असे आयोगाने म्हटले आहे. महाराष्ट्र व हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसने ईव्हीएम आणि मतदार याद्यांवर शंका उपस्थित केली होती. महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारी वाढवून दाखविली जात आहे. सायंकाळी पाच वाजता संपलेल्या मतदानाची आकडेवारी आणि अंतिम आकडेवारी यात मोठी तफावत आहे, असे आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले होते. दरम्यान, सायंकाळी पाच वाजेच्या मतदान आकडेवारीची तुलना अंतिम आकडेवारीशी करणे योग्य नाही, असे निवडणूक आयोगाने काँग्रेसला दिलेल्या उत्तरात म्हटले आहे.

**काय म्हटले आयोगाने?**

सायंकाळी ५ ते पावणेबारा या वेळेत मतदानात वाढ होणे एक सामान्य बाब आहे. कारण, यादरम्यान मतदानाच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया सुरू असते. वास्तविक, मतदान आणि मतांची मोजणी यात किंचितसा फरक आढळून येऊ शकतो, असेही आयोगाने म्हटले. कारण, एकूण मतदानाची माहिती असलेला फॉर्म १७-सी हा प्रत्येक उमेदवाराच्या प्रतिनिधीला दिला जातो. एवढेच नव्हेतर, मतदार यादी तयार करताना सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते.

यामुळे मतदारांची नावे काढण्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली नाही, असे आयोगाने स्पष्ट केले. ५० मतदारसंघांत याद्यांमध्ये ५० हजार मतदारांची नावे अतिशय हुशारीने जोडण्यात आली. त्यामुळे यापैकी ४७ मतदारसंघांत भाजपचा विजय झाला, असा आरोप काँग्रेसने केला होता.

# फेब्रुवारी नंतरच बेलोरा विमानतळावरून विमान उडण्याची शक्यता
## धावपट्टीवरील विद्युत यंत्रणेचे काम सुरू




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
बेलोरा विमानतळाच्या टर्मिनल इमारतीसह एअर ट्रैफिक कंट्रोल इमारतीचेही काम पूर्ण झाले असून, सध्या नाइट लौंडिंगसाठी धावपट्टीवरील विद्युत यंत्रणेचे काम सुरू केले आहे. हे काम पूर्ण करण्यास किमान एक महिन्याचा कालावधी लागेल. कारण, रात्री विमान उतरण्यासाठी विशेष प्रकारचे विद्युत दिवे धावपट्टीवर 'इंडिकेटर्स' म्हणून वापरले जातात. ते बसवण्याचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती विमानतळ व्यवस्थापनाद्वारे देण्यात आली. बेलोरा येथील विमानतळावर सर्वच मुख्य कामे पूर्ण झाली आहेत. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनातहीमुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन हे विमानतळ वन्य प्राण्यांपासून मुक्त करावेत, अशा सूचना दिल्या. कारण, संपूर्ण बांधकाम, यंत्रणा सज्ज असली तरी केवळ वन्य प्राणी हाच मुख्यअडथळा आहे.

### फेब्रुवारीपासूनच विमानोड्डाण शक्य

नाइट लौंडिंगसाठी यंत्रणा, वन्य प्राणी काढल्यानंतरच डीजीसीएकडे विमानोड्डाण परवाना मिळवण्यासाठी अर्ज करावा लागतो. हा परवाना मिळाल्यानंतर येथून ७२ आसनी विमानसेवा सुरू होईल. तरी यासाठी फेब्रुवारीपर्यंतचा कालावधी लागेल.

**गौरव उपश्याम, व्यवस्थापक, बेलोरा विमानतळ.**

**परिसरातील प्राण्यांचा अडथळा**

विमानतळ सुरू करण्यात परिसरात असलेल्या प्राण्यांचा मोठा अडथळा निर्माण झाला. आजवर वा विभागाच्या मदतीने सापळे रचून हरिण, चितळ, नीलगायी, ससे हे प्राणी बाहेर काढले. परंतु, अजूनही येथे प्राणी आहेत. ते बाहेर काढण्यास - ८ ते १० दिवस लागतील. विमानतळ परिसरातील प्राणी पूर्णपणे बाहेर तो दूर केल्याशिवाय सुरक्षित टेकऑफ व लडिंग शक्य नाही. यासाठी वा विभागाची मदत घेत दिवसरात्र प्राणी पकडून बाहेर करण्याचे काम सुरू आहे. निघाल्यानंतर विमानोड्डाणाला कोणताही घोका नाही, याबाबत डीजीसीएची खात्री पटेल त्याचवेळी विमानोड्डाणासाठी परवाना मिळेल.

# ओडिशातून आणलेला १८ किलो गांजा जप्त
## तीन जणांना ठोकल्या बेड्या ; गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
ओडिशामधून शहरात गांजा घेऊन येणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी बडनेरा हद्दीत पकडले. या वेळी त्यांच्या ताब्यातून पोलिसांनी १८ किलो गांजा जप्त केला. जप्त केलेल्या गांजाची किंमत ३ लाख ६५ हजार रुपये आहे.

सै. मेहबूब सै. रहेमान (६२), अ. नाझिम अ. कय्यूम (४७, रा. हाजरानगर) आणि राजू नामप्पा मुंजाळे (६२, रा. राजुरा) यांना पोलिसांनी अटक केली आहे. हे तिघे मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन बडनेराकडून अमरावतीत येत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पीआय गोरखनाथ जाधव व त्यांच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला असता हे तिघे एका ऑटोतून जात असल्याचे पोलिसांना दिसले. पोलिसांनी ऑटो घांबवला, त्यावेळी दोन पोत्यांमध्ये गांजा असल्याचे पोलिसांना लक्षात आले. सदर गांजा या तिघांनी ओडिशा राज्यातून शहरात चिल्लर विक्रीसाठी आणल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले. या प्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# ९०० रुपयांचा ड्रेस पडला एक लाखाला, ऑनलाईन शॉपिंगवेळी रिफंड लिंक क्लिक केली आणि...

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २५ वर्धा**
ऑनलाइन शॉपिंग करणे वर्ध्यातील एका महिलेला महागात पडले असून ९९७ रुपयांचा ड्रेस तिला लाखाला पडला. ऑनलाईन साईटवरून मागवलेला ड्रेस आवडला नसल्याने परत करून रिफंड मिळण्यासाठी एपीके फाइल ओपन करताच महिलेच्या खात्यातून तब्बल १ लाख रुपये गायब झाले. महिलेने याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. वर्ध्याच्या म्हसाळा येथे राहणाऱ्या एका महिलेने ऑनलाइन साइटवरून ९९७ रुपयांचा ड्रेस खरेदी केला होता. मात्र, तो ड्रेस आवडला नसल्याने तिने परत केला. याचे रिफंड त्या महिलेला आले नाही. महिलेने कस्टमर केअर क्रमांकावर कॉल केला असता त्यांनी व्हॉट्सपवर संपर्क साधण्यास सांगितले.

# अमृत -२ च्या सुधारित कृती आराखड्यात शहर भुयारी गटार योजनेचा होणार समावेश
## आ. सुलभा खोडके यांच्या सूचनेनंतर भुयारी गटारसाठी १७१८ कोटींची योजना प्रस्तावित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
अमरावती शहराला आगामी ५० वर्षांपर्यंत मुबलक पाणी पुरवठा व्हावा म्हणून ८६५.२६ कोटींची अमृत-२ वाढीव पाणी पुरवठा योजना आ. सुलभा संजय खोडके यांनी मंजूर करून आणली आहे. आता शहरातील भुयारी गटार योजनेच्या कामांना गती देण्याचे त्यांनी नियोजन केले आहे. अमृत टप्पा-१ अंतर्गत रखडलेल्या शहर भुयारी गटार योजनेची कामे आता अमृत टप्पा-२ च्या १ हजार ७९१८ कोटींच्या सुधारित कृती आराखड्यात समाविष्ट करून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. नजीकच्या काळात प्रस्ताव मंजूर होऊन शहरात भुयारी गटार योजनेच्या कामांना गती मिळणार असल्याचे आ. सुलभा खोडके यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळवले आहे.

अमृत -१ भुयारी गटार योजनेत शहराच्यावाढत्या लोकसंख्येचे अनुमान लक्षात घेता तसेच योजनेच्या आयुर्मान संदर्भात सुद्धा नियोजन नसल्याने ही योजना आगामी दृष्टीने परिपूर्ण नसल्याचे समोर आले होते. या योजनेसाठी अमरावती महापालिका आपला स्वहिस्सा देऊच शकत नसल्याने योजना पूर्ण होणार नसल्याचे आ. खोडके यांना बैठकीअंती लक्षात आले. त्यामुळे केंद्र पुरस्कृत अमृत-२ चा पथदर्शी प्रकल्प हाती घेऊन अमृत टप्पा-१ शहर भुयारी गटार योजनेतील उर्वरित कामांना अमृत टप्पा-२ मध्ये समाविष्ट करावे, तसेच वर्ष २०५४ पर्यंतची शहराची लोकसंख्या गृहित धरून तसा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आमदारांच्या वतीने बैठकीतून केल्या. त्यांनतर मजीप्रा प्रशासनाच्या वतीने आ. सुलभा खोडके यांच्या मागील दोन बैठकांमध्ये दिलेल्या सूचनांच्या संदर्भान्वये परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केला.आ. खोडके यांच्या प्रयत्नातून नुकतीच शहरासाठी ८६५.२६ कोटींची अमृत-२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. अमरावतीसाठी एकाच वेळी दोन योजना प्रस्तावित करण्यात आल्या. मात्र राज्य शासनाकडून एका वेळी एका मतदारसंघासाठी केवळ एकच योजना कार्यान्वित करता येऊ शकते, असा नियम आहे. म्हणून केंद्र पुरस्कृत अमृत-२ अभियान अंतर्गत गठीत केलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत अमृत-२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना मान्य केली व केंद्र सरकारकडे शिफारस करून योजनेला मंजुरी देखील मिळाली होती. त्यामुळे केंद्र पुरस्कृत अमृत २ मध्ये भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव प्रलंबित राहिला होता. पण ही योजनाही कार्यान्वित करता येत असल्याने आ. खोडके यांचा पाठपुरावा सुरूच होता हे विशेष.



# शहराच्या ख्रिस्ती धर्मप्रांतात प्रभू येशु ख्रिस्तांच्या जन्मपर्व ख्रिसमस दिनाचा उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
दया सागर प्रभू येशू ख्रिस्तानी मानवतेचा व अहिंसेचा संदेश दिला. त्यांची ही शिकवण सर्वांनी आत्मसात करून आपले जीवन सुखकर बनविणे ही आजची गरज आहे. येशूच्या विचारांचे आचरण केल्यास निश्चितच पृथ्वीतलावर प्रेम,सुख,शांती नांदू शकते. त्या काळात जगात सगळीकडे हाहाकार माजल्यामुळेच प्रभू येशूंनी जन्म घेतला होता. दुर्दैवाने आजही तीच परिस्थिती आहे. आज संपूर्ण जगात सगळीकडे कलह,द्वेष व भांडण तंटे सुरू आहेत.अशा प्रसंगी शांती आणि समेट हा प्रभू येशूचा संदेश खूप महत्त्वाचा आहे. देव आणि मानव यांच्यातील दुरावलेले संबंध पुन्हा जुळावे यासाठी येशूने जन्म घेतला होता. जेव्हा समेट घडेल तेव्हाच लोक एकमेकांवर प्रेम करू लागतील आणि आपोआपच जगात शांती,प्रेम,आनंद व प्रीती नांदेल. हीच प्रभू येशूच्या चरणी खरी प्रार्थना ठरणार असल्याचे शुभेच्छापर मनोगत अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय

## आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी दिल्या मेरी ख्रिसमस दिनाच्या शुभेच्छा

खोडके यांनी व्यक्त केले.

आज दिनांक २५ डिसेंबर रोजी देशभरात नाताळ सणाचा आनंदोत्सव साजरा करण्यात येत असतांना अमरावतीच्या ख्रिस्ती धर्मप्रांतात सुद्धा मेरी ख्रिसमस- हैप्पी ख्रिसमस चा उत्साह दिसून आला. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा अमरावतीच्या आमदार - सौ. सुलभाताई खोडके इर्विन चौक समीपस्थ सेंट फ्रान्सिस झेव्हीअर चर्च येथे जाऊन प्रभू येशु ख्रिस्त यांची



प्रार्थना करून विश्व कल्याणाची मनोकामना केली. तसेच सर्व अनुयायांना मेरी ख्रिसमसच्या शुभेच्छा प्रदान केल्यात. दरम्यान ख्रिसमस निमित्य पोलीस आयुक्तालय अमरावती शहर व राष्ट्रीय एकता मंच अमरावतीच्या वतीने आयोजित नाताळ कार्यक्रमालाही आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी उपस्थित राहून समस्त अनुयायांसमवेत ख्रिसमस दिनाचा आनंद द्विगुणित केला.

भगवान येशू यांनी आपल्या सर्वांना उन्नतीचा मार्ग दाखविला. आनंदाचे क्षण वेचणारा सण साजरा होत असतांना आजच्या या प्रेममय रहस्यात प्रत्येकाने ख्रिस्ताच्या प्रेमाचा अनुभव घेऊन,हा अनुभव दुसऱ्यांना देण्यास ,इतरांमध्ये ख्रिस्त पाहण्यास आणि इतरांसाठी ख्रिस्त होण्याची मदत करावी असा संदेश

अमरावतीचे प्रमुख धर्मगुरू फादर रमशीन यांनी दिला. दरम्यान अमरावतीचे प्रमुख धर्मगुरू फादर रमशीन, बिशप माल्कम सिक्वेरा यांनी आ.सौ. सुलभाताई खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दरम्यान लहान मुलांच्या वतीने सुरेल आवाजात कॅरॉल म्हणजे अर्थातच येशूच्या जन्माच्या गाण्यांचे अप्रतिम असे सादरीकरण केले. तसेच प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मप्रसंगाचे वर्णन करणाऱ्या प्रतीकात्मक देखाव्याने सुद्धा सर्वांचे लक्ष वेधले होते. यावेळी आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या समवेत अमरावती परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त सागर पाटील ,आचार्य आईसाहेब कमलताई गवई, मनपा सहाय्यक आयुक्त नरेंद्र वानखडे, राष्ट्रीय एकता मंचाचे सुरेश रतावा तसेच ख्रिश्चन बांधव व अनुयायी मोठ्या प्रामुख्याने उपस्थित होते. त्याच बरोबर आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी शहरातील विविध चर्च मध्ये जाऊन सुद्धा प्रभू येशू ख्रिस्त यांची प्रार्थना करीत सर्व अनुयायांना ख्रिसमस दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# २१ किमी हाफ मॅरेथॉन स्पर्धा मध्ये पुरुष गट मधून नागपूरचा राजन यादव पहिला तर महिला गट मधून साताऱ्याची साक्षी जडलाय प्रथम

## अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन' स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद : ३४५७ स्पर्धक धावले अमरावती शहरातील रस्त्यावर : स्पर्धकांवर बक्षिसांची लयलूट








### – विविध वयोगटातील विजेता –

१४ वर्षाआतील मुले ३ किमी – प्रद्युम्न राऊत , कपिल हटकर , सनम बोधडे , सुमित चव्हाण , सोहम जाधव

१४ वर्षाआतील मुली ३ किमी – ईश्वरी काळमेघ , यशस्वी राठोड , संस्कृती पळसपगार , मनवा ढोबळे , नंदिनी सावरकर

१६ वर्षाआतील मुले ५ किमी– अनिकेत जंगले, प्रणय राठोड,अभय इंगळे,उमेर खान, हरीश खिल्लारे ,नुमान शहा

१६ वर्षाआतील मुली ३ किमी– जानवी बावणे, हिमांशी बावणे , सालिया खान, ऋतिका नंदेवार, स्नेहा चौधरी , साक्षी मून

२० वर्षाआतील मुले ८ किमी – समित टाके, प्रणय माहुले, कार्तिक चव्हाण , ऋषिकेश वावरे , मनीष फाटे , अनिल जाधव

२० वर्षाआतील मुली ५ किमी – मिताली भुयार , अंजली मडावी , पायल मडगे , नंदिनी जाधव, राधा नाकतोडे , मीनाली धारपाटे

४० वर्षावरील पुरुष ५ किमी– भास्कर कांबळे मल्लिकार्जुन पारडे अर्जुन साळवे प्रमोद उरकुडे पवन प्रजापति संतुलिवा वार्डे

४० वर्षावरील महिला ५ किमी – प्रमिला लामकाने , प्रतिभा नाडकर , श्रद्धा भोयर , शिल्पा थोरात , वैशाली ढोबळे , प्रीती धांदर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२५अमरावती**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या राज्यस्तरीय स्पर्धेला संपूर्ण राज्यातून प्रचंड असा प्रतिसाद मिळाला तर आज सकाळी अमरावती शहराच्या रस्त्यावरून तब्बल ३४५७ स्पर्धक धावले हे विशेष.

अमरावती येथे 'अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन' स्पर्धा आज बुधवार(दि. २५ ) उत्साहात पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून ३४५७ धावपटूंनी मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतला होता. पहाटेपासून मॅरेथॉन विविध गटातील स्पर्धेला सुरुवात झाली. गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा थलेटिक संघटना वतीने या स्पर्धेत हजारांपेक्षा अधिक धावपटूंनी सहभाग घेतला होता. अतिशय उत्कंठापूर्वक वातावरणात २१ कि.मी. अंतराची हाफ मॅरेथॉन सकाळी वेळेवर ५.३० वाजताच सुरू झाली. त्यानंतर अनुक्रमे १०, ८, ५ आणि ३किमी अंतराच्या शर्यती पार पडल्या. या शर्यतीत अमरावती शहरातील विविध घटकांनी सहभाग नोंदवला. तसेच रन फॉर अमरावती उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. यावेळी मुख्य आयोजक तुषार भारतीय , गेल इंडिया कंपनीचे प्रा रवी कोल्हे , माजी महापौर चेतन गावंडे , प्रशांत शेंगोकर , प्रा अतुल पाटील , ऋषी खत्री , माजी नगरसेविका सुरेखा लुंगारे , रेखा भुतडा , सुनंदा खरड , सौ रश्मी नावंदर , सौ लता देशमुख , प्रणित सोनी , डॉ श्याम राठी , डॉ अजय कांत , डॉ मिलिंद पाठक सोबतच अन्य मान्यवरांनी यांनी स्पर्धेला झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात केली . २१ किमी, १० , ८ ५ , ३ किमी अंतराच्या शर्यतींना बडनेरा रोड येथील दसरा मैदानातून प्रारंभ झाला. स्पर्धेचा प्रारंभ दसरा मैदान , राजापेठ , कवर नगर , फारशी स्टॉप , दस्तुर नगर , यशोधा नगर , काँग्रेस नगर , बियाणी चौक , वेल कम पॉईंट , पंचवटी चौक , राठी नगर , शेगाव नाका , विलास नगर , चौधरी चौक , जयस्तंभ चौक, जवाहर गेट, गांधी चौक, भुतेश्वर चौक , रवी नगर चौक , सातूर्णा चौक , साई नगर चौक , बेदाम चौक , नवाथे चौक प्रारंभस्थानी असा होता. स्पर्धेअंती सर्व गटातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम बक्षीस स्वरूपात प्रदान करण्यात आली.

दरवर्षी 'अटल दौड हाफ मॅरेथॉन' स्पर्धा वेगवेगळ्या गटांमध्ये आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत २१, १० , ८ आणि ५ , ३ किमी अंतराच्या शर्यतींचा असतो. यंदा मॅरेथॉन मध्ये ३४५७ पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धकांना टी-शर्ट, फिनिशर्स मेडल, सर्टिफिकेट, अल्पोहर आदी बाबी पुरवण्यात येतात. अटल दौड हाफ मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी करण्याकरिता सचिन मोहोड , तुषार चौधरी , अखिलेश किल्लेदार , निरंजन दुबे , अंकेश गुजर , प्रदीप सोलंकी , सुरज जोशी , राजेश जगताप , संगम गुप्ता , आकाश वाघमारे , बंडू विघे , शुभम वैष्णव , भूषण हरकूट , कवल पांडे , हेमंत मालवीय , जितू भुजबळ , योगेश उघडे , विनोद बाबूलकर , विकास देशमुख , गोपाल भरणे , सौ वंदना इंगोले , पुष्पा लंगडे , पूजा लंडके , माला दळवी , डॉ खुशाल अलसपुरे , नितीन पोटे , मंगेश व्यवहारे , संजय मुचळंबे , नीता शेंडे , यादव सर , नितीन पोटे , नीरज डाफ , रसिक वऱ्हाडे यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

अटलजींनी भारतावर आजन्म प्रेम केले. भारताला यशाच्या उत्तुंग शिखरावर विराजमान करण्यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षण वाचला. प्रतिकूल परिस्थितीतही सतत झुंज देत भाजपाची विचारधारा समाजात रुजवली. आयुष्यात आलेल्या प्रत्येक जबाबदारीवर योग्य न्याय देत त्यांनी समाजाची सेवा केली. याच विशाल वटवृक्षाच्या समर्थ खांद्यावर भाजपाची वेल वाढली आज तोच वेलू गगनावर गेल्याच प्रत्यय आपण घेत आहोत. अशा या महान विभूतीचे स्मरण चिरकाल टिकावी, या उद्देशाने तुषार भारतीय मित्र परिवाराच्या वतीने स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती .

**खुला वर्ग महिला/पुरुष**

(Run For Fun) ३-किमी – जय पंचबुद्ध , कृष्णा योगी , निर्भय दुर्वे , जगदीश सनके , तेजस भिलावेकर , परमेश्वर सुरोशे , प्रगती तापकिरे

**खुला वयोगट**

पुरुष १० किमी – बबलू चव्हाण , अतुल बर्डे , अजित बेंडे , रामेश्वर पुंजाळ , मनीष पाटे, ईश्वर झिरवार

महिला १० किमी– रिया दोहतरे , आरती भगत , पूजा पंचबुद्धे , सलोनी तन्हाळे , सुचिता वळसे , विनिता पाल

पुरुष २१ किमी – राजन यादव , प्रधान किरोळकर , कालिदास हिरवे , लिलराम नार्वे , दयाराम गायकवाड , येनदास वसिव ,

महिला २१ किमी – साक्षी जडियाल , प्राजक्ता गोडबोले , प्रियांका ओकसा , स्वाती पंचदुधे , अदिती मेंटकर , सरोज सूर्यवंशी

# अटलजी, हा देश तुमच्याप्रती सदैव कृतज्ञ राहील! - प्रविण पोटे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**



आज भाजपा अमरावती शहर जिल्हाच्या वतीने माजी पंतप्रधान श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयीजी यांची शंभरावी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा.आ. प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय राजकारणातील एक महान नेते आणि प्रभावशाली विचारवंत होते. अनेक क्षेत्रांमध्ये अटलजींच्या नेतृत्वाचा दीर्घकालीन प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कारकिर्दीत भारताने माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार आणि संपर्क व्यवस्थेच्या जगात मोठी झेप घेतली. पंतप्रधान ग्राम सडक योजनेसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक दळणवळण वाढवण्याचे वाजपेयी सरकारचे प्रयत्नही तितकेच उल्लेखनीय होते तसेच पोखरण अणुचाचणी त्यांच्या नेतृत्वात करण्यात आली या अणुचाचणीने भारताच्या वैज्ञानिक समुदायाच्या सामर्थ्याची वेगळी ओळख जगासमोर आणली. आज माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयीजी यांची शंभरावी जयंती एकविसाव्या शतकात प्रवेश करताना भारताचे स्थित्यंतर घडवून आणणारे शिल्पकार म्हणून आपला देश अटलजींप्रति सदैव कृतज्ञ राहील असे प्रतिपादन यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले यावेळी जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, चेतन पवार, सतीश करेसिया, विवेक कलोती, अनिताताई राज सह भाजपा पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहरातील बहुतांश एटीएम सुरक्षा रक्षाकांविनाच केवळ सीसीटीव्हीचा असतो वॉच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

गॅस कटरने एटीएम मोडल्याच्या अनेक घटना घडल्या सतानाही एटीएमची सुरक्षा वाऱ्यावर आहे. न्यायालयाने सर्व एटीएमच्या काणी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याचे निर्देश बँक व्यवस्थापनाला दिले होते. मात्र, या आदेशाची सुद्धा सर्रासपणे पायमल्ली केली जात आहे. गलमरावती शहर व जिल्ह्यातील बहुतांश टीएमवर केवळ सीसीटीव्हीचाच वॉच नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली नाहे.

अमरावती शहरात प्रमुख २० ते २५ बँकांच्या शाखा व त्यांचे एटीएम आहेत.



जिल्ह्यातील अन्य शहर व ग्रामीण भागांतही या बँकांनी ग्राहकांसाठी एटीएमची सुविधा दिली आहे. कधीही या आणि पैसा काढा, या सुविधेमुळे लोकांना आता बँकेत जाण्याची गरज पडत नाही. कित्येकदा बँकेतून पैसे काढल्यानंतर बॅग हिसकावून नेणे, खिसा कापणे यासारख्या घटना घडल्या आहेत. अशात एटीएममधून पैसे काढण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. मात्र, आता एटीएममधून पैसे काढणेही धोकादायक ठरत असल्याने ग्राहकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असताना एटीएमदेखील सुरक्षित नसल्याची बाब उघडकीस आली आहे. शहरातीलबहुतांश बँकांचे एटीएम केवळ सीसीटीव्हीच्या निगराणीत आहेत. एटीएम शहरातील मुख्य परिसरात असल्याने ते फोडल्याच्या घटना घडणे तेवढेही शक्य नसल्याचे दिसले.

# शालेय पोषण आहार झाला चवदार, पण जबाबदारी वाढली; प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता १ ते ८ च्या शालेय विद्यार्थ्यांना सकस आणि चवदार आहार देण्यासाठी शाळेतून व्हेजिटेबल पुलाव, मसाले भात, अंडा पुलाव, मटार पुलाव, मूगडाळ खिचडी, चवळी खिचडी, चणा पुलाव, सोयाबीन पुलाव, मसुरी पुलाव, मोड आलेल्या मटकीची उसळ, गोड खिचडी, मूरा शेवगा, वरणभात, तांदळाची खीर, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य इत्यादी पाककृती देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन आठवड्यांमध्ये प्रत्येक दिवशी वेगवेगळे चवदार पदार्थ मिळत असून शाळांना तांदूळ, कडधान्य, तेल, मीठ आणि इतर साहित्य पुरविले असून धान्य साठा घेताना मुख्याध्यापकांची जबाबदारी वाढली आहे.अन्न शिजविण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी, पिण्याचे पाण्याची टाकी, हौदाची नियमित स्वच्छता करावे, शक्यतो पिण्याचे पाणी आरोचे वापरावे



किंवा पाणी निर्जंतूक करण्यासाठी होणारे मेडिक्लोअर, प्युरिफाईचा वापर करावा.स्वयंपाक गृहाशेजारी शॉर्टसर्किट किंवा आगीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी अग्निशमन यंत्र, वाळू व पाण्याच्या भरलेल्या बादल्या स्वयंपाकगृहाच्या किमान शंभर फुटावर असाव्यात. शिजवलेल्या अन्नाची शिक्षकांनी आधी चव घ्यावी. चव रजिस्टरमध्ये अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करावी. अन्न खाण्यायोग्य असल्याची खात्री पटल्यावर किमान २० मिनिटांनी विद्यार्थ्यांना वाटप करावे.धान्य व धान्यादी मालाचे वजन, पॅकिंगमध्ये येणारे मसाला, हळद, मिरची पावडर, खाद्य तेलाची मुदत, चणा, मूग, मटकी इत्यादीचा दर्जा तपासून उचल करणे, धान्य किडे, मुंग्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी बोरिक पावडर वापर करणे गरजेचे आहे.

किचनशेड स्वच्छता स्वयंपाकी, मदतनिसांनी साबण किंवा हॅण्डवॉशनी हात स्वच्छ धुणे, स्वयंपाकगृहाची स्वच्छता ठेवावी, किचन शेडची फरशी, ओटा फिनाइलने स्वच्छ करावे, स्वयंपाकाची भांडी, जेवणाच्या प्लेट्स, ताट, वाट्या, चमचे, ग्लास इत्यादी नियमित स्वच्छ ठेवावेत. अन्न नेहमी झाकून शिजवावे. जेवणापूर्वी विद्यार्थ्यांनी साबणानी हात स्वच्छ धुतल्याची खात्री करावी.

# महानगरपालिकेची नायलॉन मांजा जप्ती मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

प्रतिबंधित नायलॉन मांजा मोहिमे अंतर्गत रामपुरी कॅम्प परीसरात नायलॉन मांजा जप्ती मोहिम राबविण्यात आली. यावेळी रामपुरी कॅम्प संतोषी माता मंदिराजवळ सापळा रचून दोन युवकांना नायलॉन मांजाची विक्री करतांना पकडण्यात आले. नियमानुसार प्रतिबंधात्मक नायलॉन मांजाचा दंड भरण्यास सांगितल्यावर दंड भरण्यास मनाई केली असता त्यांचेवर गाडगे नगर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कार्यवाहीमध्ये विक्की जेधे पथक प्रमुख नोडल अधिकारी, विजय बुरे जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, राजू डिक्याव जेष्ठ स्वास्थ निरीक्षक तसेच स्वास्थ्य निरीक्षक इमरान खान, पंकज तट्टे, अनिकेत फुके उपस्थित होते.